## प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, तालुका-सातारा, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र यांच्या सातारा जिल्हयातील प्रस्तावित १६ वाळू भूखंड उत्खननाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत

प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,तालुका-सातारा, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र यांच्या सातारा जिल्हयातील प्रस्तावित १६ वाळू भूखंड उत्खननाबाबत जसे की -

१) गट नं.१०९२, मुक्काम-जिंती वाळू स्थळ, तालुका-फलटण

२) गट नं.७६६, ७७५, ७७४, ७७२, ७७१, ७७०, ७६९, ७६८, ७६७, ७६५, ६८०, ६८१, ६८२, ६८४,६८८, ६९०, ६९१, ६१३, ७१०, ७११ व ७१३ मु.पो. तडवळे संमत, वाळू स्थळ, तालुका-कोरेगांव, ३) गट नं. ४४०, ४३० व ४३२, मुक्काम-कवडेवाडी वाळू स्थळ, तालुका-कोरेगांव, ४) गट नं.४४४, ४४२, ४४६, ४५३ ते ४५५, ४७९,४८०, ४८२ व ४८१अ, मुक्काम-पिंपोडे खुर्द वाळू घाट, तालुका-कोरेगाव, ५) गट नं. १२१३, ४१५/१/२, ४१३,४१८ ते ४२०, ४२५. ४२८, १८५१, १८५२, १८५४, १८५५/२, १८६१ व १८६८, मुक्काम काले वाळू स्थळ, तालुका-कराड, ६) गट नं.३८. मुक्काम-खालकरवाडी वाळू स्थळ - २,तालुका-कराड, ७) गट नं. १७४० ते १७५५,मुक्काम -वाठार वाळू स्थळ-२, तालुका-कराड, ८) गट नं.१०५, १०६,९०, मुक्काम-खालकरवाडी वाळू स्थळ-१, तालुका-कराड, ९) गट नं. २४३ ते २५७, मुक्काम-शिर्ताव वाळू स्थळ-१,तालुका-माण, १०) गट नं. ४१९, ४२०, ५२४, ५२५ व ५२६, मुक्काम-बिदाल, वाळू स्थळ -२,तालुका-माण, ११) गट नं.१८२, १५६, १५७ व १५८, मुक्काम-बिदाल वाळू स्थळ-६, तालुका-माण, १२) गट नं.२७५, १०९, ११०, १११, मुक्कामं बिदाळ वाळू स्थळ -४,तालुका-माण १२) गट नं.२७५, १०९, ११०, १११, मुक्काम-बिदाळ वाळू स्थळ - ४, तालुका-माण, १३) गट नं. २८० ते २८६, मुक्काम-बिदाल वाळू स्थळ-३, तालुका-माण, १४) गट नं. १२५९. १४१३, १३९६, १३९७, १४०२ व १४०३, मुक्काम-पळशी वाळू स्थळ-२,तालुका-माण,१५) गट नं. १६८४, १६८३, १५२६ व १४२८ ते १४८३ मुक्काम - वाठार वाळू स्थळ-३, तालुका-कराड, १६) गट नं. १३५३, १३६४, १३६६, १२९६, १२८२ व १२९७ मुक्काम - पळशी वाळू स्थळ-१, माण , जिल्हा-सातारा

पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी दुपारी ११.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, सातारा यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी दुपारी ११.०० वाजता रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-२१ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २२०३०३- एफटीएस-०२३२ दिनांक ०३ मार्च, २०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,सातारा<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण<br>मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी-<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>सातारा | - | **आयोजक** |

श्री एल. एस. भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुनील थोरवे, अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री शंकर वाघमारे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे

प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्रं. १५३३, दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र संकीर्ण २०१९/प्र.क.०१/तां.क. ३-१२-२०१९ नुसार गौण खनिज (वाळू गट) बी-१ संवर्गात समाविष्ट केल्याने अशा प्रकल्पांना महाराष्ट्र शासनाची पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री भड, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,तालुका-सातारा, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र यांच्या सातारा जिल्ह्यातील

प्रस्तावित १६ वाळू भूखंड उत्खननाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीआयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्पामुळे विस्थापीत होणा-या रहिवाश्यांच्या समस्या जाणून घेणे, प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंग्रजीत यात इंग्रजीत दिनांक १९ फेब्रुवारी, २०२२ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर, मा. जिल्हाधिकारी कार्यालय - सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सातारा, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सातारा, तहसीलदार, तहसील कार्यालय - कराड, जिल्हा-सातारा, कोरगांव, तहसील कार्यालय - कोरेगांव, जिल्हा-सातारा, दहिवडी, तालुका-माण, जिल्हा - सातारा, तहसील कार्यालय-फलटण, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय - मुक्काम पोस्ट-जिंती, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय - मुक्काम पोस्ट-तडवळे संमत, तालुका-कोरेगाव, जिल्हा-सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय- मुक्काम पोस्ट-कवडे वाडी, तालुका-कोरेगाव, जिल्हा-सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय - मुक्काम पोस्ट- पिंपोडे खुर्द, तालुका-कोरेगाव, जिल्हा-सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय - मुक्काम पोस्ट-काले, तालुका-कराड, जिल्हा-सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय -

मुक्काम पोस्ट-खालकरवाडी,तालुका-कराड, जिल्हा-सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय - मुक्काम पोस्ट-शिरताव,तालुका-माण, जिल्हा-सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय - मुक्काम पोस्ट-बिदाल,तालुका-माण, जिल्हा-सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय - मुक्काम पोस्ट-पळशी,तालुका-माण, जिल्हा-सातारा,मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सातारा, व मप्रनि मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की श्री सुनील खाडे आणि संबंधित गटातील सर्व शेतकरी बांधव यांची १७ मार्च, २०२२ रोजी तक्रार प्राप्त झालेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले.

प्रकल्प प्रवर्तकांच्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) बाबत माहिती देताना सांगितले की सदरहू १६ वाळू गट उत्खननासाठी तेथील संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाने ना हरकत प्रमाणपत्र अदा केलेले असून उत्खनन हे राज्य पर्यावरण समितीने ठरवून दिलेल्या कालावधीपर्यंतच केले जाईल. त्याचप्रमाणे मान्सून कालावधीत म्हणजे १० जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत उत्खनन करण्यात येणार नाही. सदरहू प्रकल्पाचा खाणकाम आराखडा हा केंद्र शासनाच्या भूविज्ञान व खनिकर्म संचानालय, नागपूर यांनी मंजूर केलेला आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रश्नकर्त्याने आपले संपूर्ण नांव व पता सांगण्याची सूचना केली .

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री तानाजी अनंतराव खालकर, राहणार-मुक्काम पोस्ट-खालकरवाडी, तालुका-कराड, जिल्हा-सातारा:-**

श्री तानाजी खालकर यांनी सांगितले की वाळू उपसा झाल्यानंतर वाळू वाहतुक करताना खाजगी शेतकरी त्यांच्या खाजगी शेतातून वाळू वाहतुक करुन देत नाही. ते विरोध करतात, त्यामुळे पुढे तो वाद पोलिस स्टेशनपर्यत जातो. तरी याबाबत दुसरी काही व्यवस्था करता येईल काय?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की सदरहू आक्षेप हा पर्यावरणीय नसून प्रशासकीय आहे. तरी आपण तेथील स्थानिक पातळीवर किंवा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करु शकता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदस्य यांना बोलण्याची विनंती केली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित वाळू उत्खनन प्रकल्पाबाबत सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

सदस्य यांनी शासकीय अधिकारी उपस्थित असल्यास त्यांनीही प्रश्न विचारण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. सदस्य यांनी सांगितले की जर कोणाला प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात स्थानिक उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ सातारा किंवा जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांना सादर करण्यात याव्यात असे सांगितले.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) तयार करताना सर्वेक्षण केलेले असेल तर त्यावेळेस आढळलेली हवा गुणवत्ता व पाण्याची गुणवत्ता याची योग्यप्रकारे संपूर्ण माहिती आकडेसहित (figures) सादरीकरणात दिली असती तर ती उपस्थित स्थानिकांना चांगली कळली असती. स्थानिक जनतेस सद्याची गुणवत्ता व उत्खनननानंतरची गुणवत्ता कळली असती. तरी पर्यावरण सल्लागारांना सूचना

करण्यात येते की त्यांनी वाळू उत्खनापूर्वीची Ambient Air Quality आणि जलस्त्रोतांची गुणवत्ता याचा डेटा गोळा करण्यात यावा. वाळू उत्खनन झाल्यानंतरचाही Ambient Air Quality आणि जलस्त्रोतांची गुणवत्ता याचा डेटा गोळा करण्यात यावा, जेणेकरुन प्रस्तावित वाळू उत्खनाचा परिणाम पर्यावरणावर झाला वा त्यात काही तथ्य आहे काय हे समजेल. सदस्य यांनी पुढे सांगितले की झाडे व त्याबाबतचे निर्देश याबाबतचे सर्व रेकॉर्ड संबंधित सक्षम विभागांनी योग्य प्रकारे राखणे गरजेचे आहे.

आयोजक यांनी माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेले एक (1) सूचना/आक्षेप जोडलेले आहेत.

**(एल. एस. भड)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,सातारा

**(शंकर एल. वाघमारे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,पुणे

**(सुनील थोरवे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा,
जिल्हा-सातारा